# प्रकरण २ रे

## पद्मा गोळे : व्यक्ती व वाङ्मय

कवयित्री पद्मा गोळे यांचा जन्म १० जुलै १९१३ ला झाला. त्यांचे संपूर्ण नाव पद्मावती विष्णू गोळे. त्यांचे बालपण तासगावला गेले. तासगांव हे सांगली जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण. एके काळी पेशवाईतले पराक्रमी सरदार परशुराम पटवर्धन यांना मिळालेले इनाम गाव. कवयित्री ह्या परशुराम पटवर्धनांच्या सहाव्या पिढीतल्या. कवयित्रीचे बालपण किल्लेवजा वाड्यात गेले.

पटवर्धन खानदानातील हरभट पटवर्धन हे गणपती पुळ्या-जवळील कोतवड्याच्या गणपतीचे उपाध्याय. दोन वर्षे दुर्वांच्या रसावर राहून त्यांनी उपासना केली. गणपतीने दृष्टांत दिला; "देशावर जा". अशी आख्यायिका आहे[१]. देशावर आल्यावर इचलकरंजीकर घोरपडे सरकार भेटले. त्यांच्या आश्रयाला ते राहिले. घोरपडे व पेशव्यांचे घनिष्ट संबंध असल्याने हरभटांच्या सर्व मुलांना पेशवे दरबारी नोकरीस ठेवले. या मुलांपैकी रामचंद्र हरभटांचे चिरंजीव परशुराम. परशुराम यांचा जन्म पुण्यास इ.स. १७४० साली झाला. ते सहा वर्षांचे असतांना त्यांचे वडील निवर्तले. त्यानंतर परशुराम पेशव्यांकडे राहिले व कारकुनी शिकले. त्यांचे चुलते त्यांना "सैन्यातील बहादुरी शिका" असे म्हणाले. सैनिकी शिक्षण घेण्यास चुलत्यांनी परशुराम पटवर्धनांना प्रोत्साहन दिले. वयाच्या १४ व्या वर्षी ते युद्धशास्त्रात निपुण झाले. श्रीमंत पेशव्यांनी त्यांना लढाईवर पाठविले. वयाच्या १४ व्या वर्षी त्यांनी सावनूर युद्धात पराक्रम केला. युद्ध कौशल्यावर खूष होऊन त्यांना पेशव्यांकडून कोरेगांव बक्षीस

मिळाले. इ.स. १७७१ ते १७८९ मिरज प्रांत कसबे तासगांव इथली जहागिरी देऊन परशुरामभाऊंना पेशव्यांनी नेमले. स्वारीवर जातांना ते गणपती पुळ्याला गणपतीचे दर्शन घेऊन जात. पुढे त्यांना दृष्टांत झाला की, "माझे मंदिर तासगांवी बांध". त्यानुसार त्यांनी इ.स. १७७९ साली तासगांवला गणपतीचे देऊळ बांधले. सरदार परशुरामभाऊंनी दक्षिणेकडे अनेक स्वाऱ्या केल्या. तिकडील पध्दत पाहून त्यांनी मंदिर बांधले. महाराष्ट्रातील गोपूर असलेले हे एकमेव मंदिर असावे. या गणपतीचा पाच दिवस मोठा उत्सव पूर्वीच्या काळी व्हायचा. हा उत्सव वाड्यातही व्हायचा. हा वाडा अत्यंत कलात्मक पध्दतीने बांधलेला होता. छतावर उत्तम कलाकुसर; नक्षीकाम होते. जागोजागी जुनी पेंटिंग्ज, दुर्मिळ छायाचित्रे लावलेली होती. वाड्यात आरसेमहाल होता. भिंतीवर लहानमोठे आरसे लावलेले होते.[२]

अशा भव्य वाड्यात त्यांचे बालपण गेले. कवयित्रीचे पूर्वाश्रमीचे नांव पद्माराजे विनायक पटवर्धन. विनायकराव परशुराम पटवर्धन यांना तीन मुली व दोन मुलगे. पैकी पद्मा हे त्यांचे तिसरे अपत्य. विनायकराव पटवर्धनांची पत्नी म्हणजे कवयित्रीची आई, मवाळ, प्रेमळ पण शिस्तप्रिय होती. त्या मानाने विनायकराव हे कडक व शिस्तप्रिय होते. त्यांचा तासगांवात दरारा होता. कवयित्रीची आई मात्र कधी रागावत नसे. सर्व कांही प्रेमाने समजावून सांगण्यावर त्यांचा भर होता. चारचौघात कसे वागावे, मोठ्या माणसांशी कसे बालावे हे त्यांनी समजावून सांगितले. हे खानदानीपणाचे संस्कार कवयित्रीच्या बालमनावर झाले.

तासगांवच्या वाड्यात आणि गणपतीच्या देवळात

कथापुराणे नेहमीच चालू असायची. दर पौर्णिमेला सत्यनारायणाची पूजा घातली जायची. गणपती उत्सवाच्या वेळी देवळात रोज कीर्तन व्हायचे. रात्री कवयित्रीची आई रामविजय, भक्ति विजय या सारख्या पोथ्या वाचायची. वाड्याच्या चवथ्या मजल्यावर बारीव्दारी होती. दृवा प्रत्येक दिशेला तीन खिडक्या या प्रमाणे चारी दिशात खिडक्या. या ठिकाणी बसायला कवयित्रीस आवडे. सगळे तासगांव बारीव्दारीमधून दिसत असे. वाड्याच्या चौकात भोंडला व्हायचा. तासन् तास हुतूतू आटयापाटयांचा खेळ चावडात रंगायचा. मैत्रिणी फारशा नव्हत्या. त्या भावंडासह व कारभाऱ्यांच्या मुलांसह खेळ खेळत असत. घराबाहेर फारसे जावे लागत नसे. भावंडांमध्ये गाण्याच्या भेंड्या लावल्या जायच्या. भेंड्यांचा खेळ रात्री उशीरापर्यंत रंगायचा. एकदा कवयित्री आपल्या भावंडासह माडीवरील झोपाळ्यावर गाण्याच्या भेंड्यांचा खेळ खेळत होत्या. कवयित्रीच्या बहिणीने म्हणजे कमलाने एक श्लोक म्हटला. त्याचे शेवटचे अक्षर "घ" हे आले. पद्मा यांना "घ" या अक्षराचे गाणे आठवेना. तेव्हा त्यांनी स्वतःच चार ओळींची कविता रचली.

"घाली उडी संकटी यादवेन्द्रा.
जवी दिली भेट तुवा गजेंद्रा
मी वंदिते हे चरणांबुजाला
धावोनि राखे नत बालिकेला".

वयाच्या दहाव्या वर्षी कवियित्रीने रचलेली ही पहिला कविता. कवयित्रीच्या वाड्यात पुस्तकांनी भरलेली कपाटे होती. पुराणिकबुवा त्यांच्या घरीच होते. त्यांना संस्कृत शब्दांचा अर्थ विचारून त्यांचे संस्कृत चांगले झालेले होते.

SHIVAJI UNIVERSITY LIBRARY KOLHAPUR

साहित्याला पोषक असे वातावरण घरातच निर्माण झाले. त्यांच्या आजी त्यांच्याकडून कविता पाठ करून घेत असत.

तासगावच्या वाड्यात त्यांचे सारे विश्व एकवटले होते. याच वाड्यात कितीतरी फुलझाडे होती. त्यातले चाफ्याचे झाड हे त्यांचे आवडते झाड. रोज फुले तोडून देवासाठी हार करावयाचे हा त्यांचा आवडीचा कार्यक्रम. स्त्रीसुलभ भावनेने फुले डोक्यात माळायला त्यांना आवडली नाहीत. एखादे फूल वासासाठी त्या जवळ ठेवायच्या इतकेच. त्यांनी कविता लिहायला सुरुवात केली तेव्हा "चाफ्याच्या झाडा" ही कविता लिहितांना त्यांच्या डोळ्यांसमोर होते ते तासगांवच्या वाड्यातील चाफ्याचे झाड.

त्यांना शिकवायला गुरुजी घरी यायचे. सुरुवातीला काही काळ घरी शिकल्यानंतर त्या शाळेत जायला लागल्या. त्यावेळी त्यांचा थाट वेगळाच असायचा. शाळेत न्यायला आणायला घोडागाडी असायची. शाळेत पोहचले की दप्तर घेऊन गडी पाठोपाठ यायचा. गावात कवयित्रींच्या वडिलांचा दरारा असल्यामुळे सगळी मुले औत्सुक्याने कुतूहलाने, आदराने कवयित्रींकडे पाहात असायची. पण कवयित्रीला हा डामडौल फारसा आवडला नाही.

पुढे वडील वारल्यानंतर, त्यांची आई त्यांना घेऊन पुण्यास आली. पुण्यात त्यांचे एक घर होते. मुलांची नावे, त्यांच्या आईने म्युनिसिपल - मुलींची शाळा नं. ३ मध्ये व मुलाचे नाव मुलांच्या शाळेत दाखल केले. पुढे कवयित्रीचे नांव कै. श्री. गो. म. चिपळूणकर यांच्या कन्याशाळेत घातले. या कन्याशाळेतच त्यांचे साहित्यविश्व ख-या अर्थाने बहरले. शाळेच्या मुख्याध्यापिका होत्या बाळूताई खरे म्हणजेच प्रसिद्ध लेखिका मालतीबाई

बेडेकर तथा विभावरी शिरूरकर. त्यांनी लेखनाला उत्तेजन दिले. कवयित्रीच्या घरी कुणी कविता करत नव्हते. वडील रसिक होते. त्यांना नाटके आवडत असत. पुण्याला गेले की, बालगंधर्वांची नाटके ते पाहात. वडिलांच्या संग्रही खूप पुस्तके होती. कवयित्रीच्या वडीलांनी पुनर्जन्मावर आधारित "त्रिजन्म परीक्षण" असे नाटक लिहिले होते. वडिलांचा साहित्यनिर्मितीचा गुण त्यांच्यात उतरला. शाळेमध्ये मुंडले, धोपेश्वर हे शिक्षक त्यांना कविता लिहिण्यास प्रोत्साहन देत असत. १९३०-३१ व ३२ मध्ये कवयित्री व संजीवनी मराठे या दोघी एका वर्गात शिकत होत्या. दोघींचेही शाळेत कवितालेखन चालू होते. कवितेची वही दोघींच्याही दप्तरात असायची. दोघी आपआपल्या कविता एकमेकींना वाचून दाखवत. त्यांचे शिक्षक कधी मार्गदर्शन करायचे तर कधी कौतुक करून त्यांच्याकडून कविता म्हणवून घ्यायचे. शाळेच्या "तारका" मासिकात त्यांच्या कविता यायच्या. या मासिकाचे त्या दोघींनी मिळून संपादन केले होते.

शालेय वयातच कवयित्रीने "पन्नादाई" नाटक लिहिले. या नाटकाची स्नेहसंमेलनासाठी निवड करण्यात आली. त्यात पन्नादाईची भूमिका कु. कुसुम चिपळूणकरने अतिशय उत्कृष्टरीतीने केली होती. ही भूमिका पाहून शाळेच्या मुख्याध्यापिका बाळूताई खरे खूपच प्रभावित झाल्या. नाटक चालू असतांना त्या स्टेजवर गेल्या व त्यांनी कुसुमला शाबासकी दिली व कवयित्रीचे कौतुक केले.

मॅट्रिकला असतांना कवयित्रीने बाबूराव उर्फ विष्णू गोळे यांच्याशी प्रेमविवाह १९३२ साली केला. लग्न झाल्यावर शिकणे सासूबाईंना पसंत नव्हते; पण सासूबाईंची मर्जी संपादन करून त्यांनी त्या

काळातील एस.एन.डी.टी.विद्यापीठाची बी.ए. व नंतर एम.ए.पदवी संपादन केली. एम.ए. ला त्या मराठीत सर्व प्रथम आल्या. "कै. लोकमान्य टिळक पारितोषिक" त्यांना मिळाले होते.

कॉलेजात असताना त्यांना वा.म. जोशी मराठी शिकवायचे. त्यांना कवयित्रीचे निबंध आवडायचे. त्यांनी लेखनाला प्रोत्साहन दिले. कवयित्री कॉलेजला असताना एकदा वर्गात तास चालू असताना त्यांनी खिडकीतून बाहेर पाहिले. एवढ्या गुन्ह्यासाठी इंग्रजीचे प्रा.लागू यांनी त्यांना वर्गाच्या बाहेर काढले. शिवाय माफीही मागायला सांगितली. पण कवयित्रीने नकार दिला. त्या म्हणाल्या, " मी कशासाठी माफी मागायची ? बाहेर पाऊस पडतोय. दृश्य फार मनोहारी दिसते आहे. म्हणून मी बाहेर पाहिले." त्यावर प्रा.लागू चिडून त्यांना म्हणाले, " तुम्ही स्वत:ला फार मोठ्या कवयित्री समजता काय ?" तक्रार प्रिन्सिपॉल कमलाबाई देशपांडे यांच्यापर्यंत गेली. परंतु त्यांनी माफी मागण्यास नकार दिला. प्रा. लागूंनी त्यांना इंग्रजीच्या तासाला बसायला परवानगी नाकारली. प्रिन्सिपॉल कमलाबाई देशपांडे यांनी परीक्षेस बसण्यास परवानगी दिली. घरी अभ्यास करून कवयित्री परीक्षा पास झाल्या.[3]

संजीवनी मराठे व कवयित्रीची बालपणाची मैत्री काव्यामुळे पुन: वाढली. साहित्य संमेलन, काव्य संमेलन, आकाशवाणीवरील कविता वाचन या निमित्ताने पुन: दोघी एकत्र आल्या. पत्रांमधून दोघी एकमेकींना कविता लिहायच्या. एकदा त्यांनी संजीवनी मराठेंच्या पत्राला उत्तर दिले. " सखे. तुझे पत्र आले, सवे घेऊन श्रावण !
पावसाच्या सरी संगे, श्रावणाचे कोवळे ऊन

एकदा संजीवनी मराठे व त्यांची भेट बरेच दिवस झाली नाही तसेच पत्रही न आल्यामळे त्या संजीवनी मराठे यांना म्हणाऱ्या की, "तुझे प्रेम, स्नेह कमी झाला का ?" त्यावेळी संजीवनी मराठे यांनी त्यांना पत्र लिहिले. -

"स्नेह नाही वनरान वठणारे अवकाळी,
जिथे चिरंजीवन मूळ, स्नेह अशी कल्पवल्ली,
स्नेह महासुखकारी, दिव्य
अमृताची झरी".

अशाप्रकारे दोघींची मैत्री होती. पद्मावतींनी प्रसिद्धीच्या क्षेत्रात जरा उशीरा प्रवेश केला. त्या प्रभावीपणे कविता वाचन करीत असत. साहित्य संमेलनात श्रोत्यांकडून "वन्स मोअर" अशी दाद त्यांना मिळायची. "मौज", "सत्यकथा" या मासिकांमधून त्यांच्या कविता त्याकाळी छापून आल्या. त्यांची पहिली कविता "यशवंत" या मासिकात छापून आली.

पद्मावतींनी सामाजिक कार्यही केले. कवयित्रीने साक्षरता प्रसाराच्या कार्याला हातभार लावण्याचा प्रयत्न केला. त्या आपल्या घराच्या जवळपास एका चाळीत स्त्रियांचा साक्षरता वर्ग घेत. परंतु एक दिवस तेथे साक्षरता वर्गात येणाऱ्या महिलांना तेथील पुरुषमंडळींनी नकार दिला. तसेच पद्मावतींना तेथे येऊ नका असे सांगितले. त्यामुळे तेथे जाणे बंद झाले. एकदा त्या लक्ष्मी रोड रस्त्यावरून जात असतांना एका बाईंनी त्यांना थांबवून नमस्कार केला व ती बाई म्हणाली, " तुम्ही त्यावेळी आम्हाला लिहायला, वाचायला शिकविलं म्हणूनच आज मला चांगली नोकरी मिळाली". त्यांच्या साक्षरता प्रसाराच्या कार्याची पावती अशी

12957
A

रिमळाली.

गोवा मुक्ती आंदोलनाच्या वेळी कवयित्रीने वैद्यकीय पथकात नांव नोंदविले. जखमी सैनिकांची शुश्रूषा करीत असतांना दुःखी होऊन सैनिक त्यांना म्हणाला, " बाईसाहेब, तुम्ही कशाला आमच्या सारख्यांची सेवा करायला येथे येता ? आपल्या सारख्यांची ही कामे नाहीत. मी आपणाला ओळखतो. मी तासगांवचा आहे". हे ऐकून त्यांना आश्चर्य वाटले पण आनंदही झाला. त्या म्हणाल्या, " मग तर फारच छान. माझ्या जन्मगांवच्या एका वीरबंधूची, स्वातंत्र्यासाठी लढता लढता, जखमांचे भूषण घेऊन आलेल्या एका शूरवीर शिपायाची शुश्रूषा करण्यात मला खरंच फार आनंद वाटत आहे. तुम्ही अनेक तरुणांनी इतक्या लहान वयात केलेल्या या त्यागाचे मोल फार मोठे आहे. तुमच्या सारख्या देशभक्त बंधूंचा मला अभिमान वाटतो". या घटनांमधून त्यांना असलेले सामाजिक व राष्ट्रीय बांधिलकीचे भान दिसते.

पद्मावतींनी ज्या काळी कविता लेखनास सुरुवात केली त्या-काळी नियतकालिकातून लेखन करणारा कवी प्रतिभाशाली मानला जात असे. रविकिरण मंडळातील कवींच्या कविता त्या वाचत, नव्याने प्रसिद्ध झालेल्या कविताही त्या वाचत. इंदिरा संत. बा.भ.बोरकर, कुसुमाग्रज, शांता शेळके, शिरीष पै, लीलावती भागवत, वसंत बापट, विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर, सोपान देव चौधरी, केशवकुमार यांच्या कविता त्यांना आवडत असत. रविकिरण मंडळाच्या कवींची छाप त्यांच्या कवितांवर आहे. नव्या कविताही त्या वाचीत होत्या. नवकवींची

कविता त्यांना आवडत असल्यामुळे त्यांनी आपल्या कवितेत मुक्तछंद वापरला आहे. रविकिरण मंडळाच्या पुढील काळात त्यांची कविता येते. पद्मा गोळे यांच्या वाङ्मयाचा थोडक्यात आढावा.—

कादंबरी - "वाळवंटातील वाट"

ही अनेक भगिनींनी मिळून लिहिलेली कादंबरी. पद्मावतींनी आरंभ व उपसंहार केला. मधली प्रकरणे साहित्यप्रेमी भगिनी मंडळाच्या सभासदांनी लिहिली.

एका ज्ञानदाची सुशिक्षित स्त्रीला कुमारवयात झालेल्या एका चुकीमुळे जीवनाची वाट खडत काढावी लागते. अनेक दुःखे सहन करावी लागतात. एकटीने जीवन काढावे लागते. हा त्या कादंबरीचा आशय आहे.

"नवी जाणीव", "रायगडावरील एक रात्र", "स्वप्न", "पन्नादाई" ही पुरुषपात्रविरहित नाटके त्यांनी लिहिली. "स्वप्न" हे नाटक महिला स्नेहवर्धक मंडळासाठी लिहिले. "पन्नादाई" शालेय जीवनात लिहिले. या नाटकाचा प्रयोग स्नेहसंमेलनात झाला. "नवी जाणीव" व "रायगडावरील एक रात्र" ही दोन नाटके आकाशवाणीसाठी लिहिली.

"प्रीतिपथावर" हा प्रेमानुभवाची विविध चित्रे रेखाटणारा कवितासंग्रह आहे. यातील कविता निवेदनाच्या पातळीवरची आहे. या कवितासंग्रहात रविकिरण मंडळाचे काही विशेष आढळतात. स्वप्नाळूपणा, रोमँटिकवृत्ती हे विशेष या कवितांमधून व्यक्त झालेले आहेत.

नीहार (१९५४, द्वि.आ. १९५५)

या कवितासंग्रहाचा विशेष अभ्यास प्रकरण क्र. ३ मध्ये आपण करणार आहोत.

स्वप्नजा (१९६२)

या कवितासंग्रहातही कवयित्रीची स्वप्नाळू वृत्ती आढळून येते. या कविता संग्रहातील कविता आत्मकेंद्री आहे. क्षणानुभवांचे संवेदनमुखी चित्रण करण्यातील सफाई यांत आढळते.

"आकाशवेडी" (१९६८)

या कवितासंग्रहाचा विशेष अभ्यास प्रकरण क्र. ४ मध्ये आपण करणार आहोत.

"श्रावणमेघ" (१९८८)

हा त्यांचा शेवटचा कवितासंग्रह. सदरचा कवितासंग्रह उपलब्ध होऊ शकला नाही.

"श्रावणमेघ" नंतर त्यांनी काव्यलेखन बंद केल्याचे जाणवते. पद्मा गोळे यांनी लेखनासाठी प्रामुख्याने काव्य हाच साहित्यप्रकार निवडला. कवयित्री म्हणूनच त्या ओळखल्या जातात.

वीणा देव यांनी कवयित्रीच्या विषयीचा आपल्या मनातील आदराचा भाव जो व्यक्त केला आहे त्यावरून त्यांच्या काव्यप्रवासाची आपणाला सहज कल्पना येते. वीणा देव म्हणतात," लहानपणापासून त्यांना (पद्मा गोळे यांना) दुरून पहात होते. त्यांच्या कविता वाचत

होते. ऐकत होते. वेगवेगळ्या कारणांसाठी त्या कवितांवर लुब्ध होत होते. चाफ्याच्या झाडाशी मनातलं बोलणारी ही कुलीन कन्या ज्या नाजूकपणानं आणि तरीही ताकदीनं सुकुमार आणि मधुर प्रेमभावना तिच्या विविध रंगासह आपल्या कवितेत फुलवत होती. त्यानं मन प्रसन्न होत होतं. त्यांच्या कवितेतली वेगवेगळी स्त्रीरूपे मोहवीत होती. एकेका संग्रहातून कवयित्री म्हणून प्रगल्भ होत जाणारं त्यांचं रूप सुखावत होतं" ४.

कवयित्रीच्या व्यक्तीमत्वाचा अतिशय मार्मिक वेध अनुराधा पोतदार यांनी घेतलेला आहे. त्या म्हणतात, "स्वप्नास्वप्नांचे तोंडावळेही वेगवेगळे असतात, वेगवेगळे होतात. पण आयुष्यभराची स्वप्नं अंतर्यामी जपण्यासाठी कोमलता आणि कणखरपणा यांचं जे दुर्मिळ रसायन व्यक्तिमत्वात असावं लागतं ते पद्माताईंपाशी आहे. तेव्हांही होतं, आजही आहे" ५

वरील विवेचनातून आपण कवयित्रीच्या घराण्याचा पूर्वेतिहास बालपण, संस्कार, शिक्षण, काव्यरचनेचा प्रारंभ, पुण्याचे दिवस, संजीवनी मराठे या बालमैत्रिणीचा सहवास, विवाह, एम.ए.पदवी संपादन, संजीवनी मराठे यांच्याशी असलेली दीर्घकालीन पत्रमैत्री, सामाजिक कार्य, साहित्याचा धावता आढावा घेतला. यानंतर पुढील प्रकरणातून त्यांच्या काव्यलेखनाची वैशिष्टये पाहण्याचे योजिले आहे.

xxxxxx

## प्रकरण दुसरे = संदर्भ

१) खाडगे मंदा, "पद्माताईंच्या गावी" समाविष्ट
"महाराष्ट्र साहित्य पत्रिका"
जुलै - सप्टेंबर १९९३, पृ. १८

२) गोळे पद्मा - "थोरांचे बालपण", समाविष्ट
"दैनिक सकाळ". १४-९-१९९४ पृ.२

३) सुर्वे नंदा - "त्यांचे कॉलेजचे दिवस".
समाविष्ट. "दैनिक सकाळ"
दि. १९९४ पृ.२

४) देव वीणा - "पानाआडची पापेळी",
समाविष्ट "विविधा".
दिवाळी १९९३. पृ. ३२.

५) पोतदार अनुराधा - "सहकंप".
पुणे, १९९२, पृ. १९७-१९८.

xxxxxx